# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४१९/२०२३ दिनांक – ०६/१२/२०२३

## अग्निशस्त्र विक्री करण्यासाठी आलेल्या इसमास एक गावठी कट्टा व २ जिवंत काडतुसासह अटक
## तुळींज पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनांक ०४.१२.२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.ह.वा. वरठा यांना एक इसम संत निरंकारी सत्संग भवन समोरील मोकळ्या जागेत ओसवालनगरी नालासोपारा पुर्व येथे अग्निशस्त्र विक्री करण्याकरीता येणार असल्याची गोपनीय माहीती त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. मिळालेल्या गोपनीय माहीतीची शहनिशा करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी तुळीज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर यांनी पो.उप.निरी. राख तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी संत निरंकारी सत्संग भवन समोरील मोकळ्या जागेत ओसवालनगरी नालासोपारा पुर्व येथे सापळा रचुन आरोपी इसम नामे दुर्वेश दत्ताराम जुवळे वय २४ वर्षे धंदा- खाजगी नोकरी रा. रुम नं. २०३ ए विंग वसुंधरा अपार्टमेंट विजयनगर नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर यास एक गावठी कटटा व ०२ काडतुसे असा एकुण १०,४००/- रुपये किमतीच्या मुददेमालासह ताब्यात घेतले. नमुद आरोपी याने विनापरवाना स्वतःच्या कब्जात अग्निशस्त्र व दोन जिवंत काडतुसे बाळगल्याने त्याचेविरुध्द तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ८४६/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५(१)(क) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर,यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. राख, बांदल, पो.हवा.वरठा, मोरे, केंद्रे, पो.अं. छपरीबन, कदम, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**